माहिती हवीय?

मिनल नरेश कोळी, हमरापूर.

☐ शाहरूख खानचा पहिला चित्रपट कोणता? नायिका कोण?

– शाहरूख खानचा पहिला चित्रपट *दिल तो आशना है* नायिका दिव्या भारती.

मिनल नरेश कोळी, हमरापूर.

☐ अमिताभचा पहिला हिट चित्रपट कोणता?

– *आनंद*. पण त्याला स्वतःची ओळख मिळवून देणारा पहिला हिट चित्रपट *जंजीर*.

मिनल नरेश कोळी, हमरापूर.

☐ ममता कुलकर्णी कोणत्या चित्रपटात अमिताभची नायिका बनलीय?

– १९९५च्या *बाजी* या चित्रपटात.

बाळासाहेब जी. थिटे, हडपसर, पुणे.

☐ राज कपूर, नरगीस कोणकोणत्या चित्रपटात एकत्र चमकले?

– *आग, बरसात, प्यार, जान पहचान, आवारा, अंकूर, अनहोनी, आशियाना, आह, बेवफा, धून, पापी, श्री ४२०, चोरी चोरी*.

बाळासाहेब जी. थिटे, हडपसर, पुणे.

☐ राज कपूरने आर. के. तर्फे निर्माण केलेले चित्रपट कोणते?

–*आग, बरसात, आवारा, आह, बुट पॉलीश, अब दिल्ली दूर नही, श्री ४२०, जागते रहो, जिस देश में गंगा बहती है, संगम, मेरा नाम जोकर, कल आज और कल, धरमकरम, बॉबी, बीबी ओ बीबी, प्रेमरोग, राम तेरी गंगा मैली*.

कमलाकर दत्तू कोळी, वरेडी कोळीवाडा.

☐ अमिताभ व जयाप्रदा यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र काम केलंय?

– *आखरी रास्ता, शराबी, आज का अर्जुन, इन्सानियत*.

शशीकांत गजानन कोळी, वरेडी कोळीवाडा.

☐ जितेंद्र व श्रीदेवी यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?

– *हिम्मतवाला*.

प्रतिभा प्रकाश कोळी, वरेडी, पेण.

☐ प्रेम चोप्राचा पहिला चित्रपट कोणता?

– *मुड मुड के ना देख*.

राजेंद्र विठ्ठल कोळी, वरेडी, कोळीवाडा.

☐ नूतनचा पहिला चित्रपट कोणता?

– १९३३चा *नल दमयंती*. या चित्रपटात ती बालतारका होती. १९५०चा *हमारी बेटी* तिने नायिकेची भूमिका केलेला पहिला चित्रपट.

वर्षा रामदास कोळी, अंतोरे पेण, कोळीवाडा.

☐ राजेश रोशनचा पहिला चित्रपट कोणता?

– *कुंवारा बाप*.

दत्तात्रेय महादेव कोळी, नवघर कोळीवाडा.

☐ अमिताभ व शशी कपूर कोणकोणत्या चित्रपटात एकत्र आले?

– *रोटी, कपडा और मकान, दीवार, इमान धरम, कभी कभी, त्रिशूल, सुहाग, काला पत्थर, दो और दो पांच, शान, सिलसिला, नमक हलाल, अजुबा*.

जिद्दी जीवन कोळी, वरेडी कोळीवाडा.

☐ निम्मीचा शेवटचा चित्रपट?



– *लव्ह ॲण्ड गॉड*.

धनाजी हरिश्चंद्र कोळी, नवघर कोळीवाडा.

☐ धर्मेंद्र, हेमामालिनी यांनी कोण-कोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *शराफत, नया जमाना, तुम हसीन मैं जवान, दो दिशाए, राजाजानी, सीता और गीता, जुगनू, दोस्त, ड्रीमगर्ल, पत्थर और पायल, प्रतिज्ञा, शोले, चरस, चाचा भतीजा, माँ, आजाद, दिल्लगी, द बर्निंग ट्रेन, दिल का हीरा, आसपास, अलीबाबा और चालीस चोर, राजतिलक, बगावत, सम्राट, रझिया सुलतान जान हथेली पे* या चित्रपटात.

रामचंद्र सखाराम सकपाळ, कांदिवली (पू).

☐ रंधवाने नायकाची भूमिका केलेले चित्रपट कोणते? नायिका कोण?

– *हर्क्यूलस* (मुमताज), *पंचरत्न, तीन सरदार* (परवीन चौधरी), *दिलवर* (सरोजारानी), *दो मतवाले, रुस्तम कौन* (मुमताज), *शेर डाकू* (निशी), *स्पाय इन गोवा* (मलिका), *सुनहरा जाल* (विजया चौधरी), *नसीहत* (सविता), *शिबा ॲण्ड हर्क्यूलस* (विजया चौधरी), *पंचरत्न* (परवीन चौधरी) यासारख्या काही चित्रपटात तो नायकाच्या भूमिकेत चमकला. या चित्रपटातील त्याच्या नायिकांपैकी मलिका मुमताजची बहीण हिच्याशी रंधवाने विवाह केला.

कृष्णा आंबाजी कोळी, वरेडी पेण.

☐ तब्बूला कोणत्या चित्रपटासाठी पुरस्कार मिळालाय?

– *माचिस*साठी तिला सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळालाय.

कृष्णा आंबाजी कोळी, वरेडी पेण.

☐ माधुरी दीक्षितचा सर्वात अधिक गाजलेला चित्रपट कोणता?

– *हम आपके है कौन?* या चित्रपटाचा व्यवसाय १७५ कोटी रुपये झालाय. इतका व्यवसाय माधुरीच्या अन्य कोणत्याही चित्रपटात मिळालेला नाही.

प्रकाश त्र्यंबकराव काळे, बांद्रा (पू), मुंबई.

☐ सुजीतकुमारने नायकाची भूमिका केलेले चित्रपट कोणकोणते? नायिका कोण?

– *एक साल पहले* (सईदा खान), *लाबेला* (मुमताज), *पती-पत्नी* (शशीकला), *लंबू इन हाँगकाँग, सब का उस्ताद, आँखे* (कुमकुम), *लहू पुकारेगा* (शबनम), *गुंडा* (जयंती), *मंगूदादा* (फरियाल), *एक दिन आधी रात* (अरुणा इराणी), *नागपूजा* (संजना), *जय ज्वाला* (सोनाली), *पुतलीबाई* (जयमाला), *झूम उठा आकाश* (अनिता), *नाग मेरे साथी* (संजना) या चित्रपटात सुजीतकुमार नायकाच्या भूमिकेत चमकला.

भावना आर. सूर्यवंशी, वरोदरा, गुजरात.

☐ रामेश्वरीने कोणकोणत्या चित्रपटात नायिकेची भूमिका केली? नायक कोण?



– *दुल्हन वही जो पिया मन भाये* (प्रेमकिशन), *मेरा रक्षक* (मिथुन चक्रवर्ती), *इकरार* (राकेश रोशन), *सुनयना* (नसीरुद्दीन शहा), *आशा* (जितेंद्र), *मान-अभिमान* (राजकिरण) *शारदा* (जितेंद्र), *वक्त वक्त की बात* (राकेश रोशन), *प्रतिभा* (दिलीप धवन), *मुझे कसम है* (मुकेश खन्ना) या चित्रपटात.

●